**नगरसचिव**

**पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता**

**पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र. १६**

**मार्च २०१९**

**पुणे महानगरपालिकेची मासिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक १ मार्च २०१९ रोजी दुपारी ३:००(तीन) वाजता हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात (पुणे महानगरपालिकेच्या नविन विस्तारीत इमारतीतील सभागृहात) भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**'' नियुक्त्या ''**

**विषय क्र.११८५**

'' महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये तसेच मनपा सभा कामकाज नियमावलीतील नियम क्र. ६४ व ६८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे खालील चार विशेष समितीवर प्रत्येकी १३ मा.सभासदांच्या महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ चे कलम ३१ (अ) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे मनपातील पक्षांच्या किंवा गटाच्या संख्या बळाच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व देवून नियुक्त्या करणे.''

**१) विधी समिती २) शहर सुधारणा समिती ३) महिला बाल कल्याण समिती ४) क्रीडा समिती**

**( टिप – महिला बाल कल्याण समिती वरील एकूण सभासदांच्या ७५% सभासदत्व महिला सभासदांना द्यावयाचे आहे.)**

**प्रश्नोत्तरे**

महाराष्ट्र म.न.पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

**मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र**

**विषय क्र.११८६**

पुणे पेठ कोथरूड स.नं.१४७,हि.नं.२+१अ व २/ब+४+५/अ येथील पी.एम.पी.एम.एल.ॲन्ड एस.टी. आरक्षणाबाबत खरेदी सुचनानुसार सदर आरक्षण ताब्यात घेणेबाबत कार्यवाही सुरू करण्याबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/१३३३,दि.८/२/२०१९ चे पत्र.

**नगरसचिव कार्यालय,**
**पुणे महानगरपालिका,**
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :–२१/२/२०१९.

**नगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.

(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) मा. नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)